# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 484
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 3 MAY 2021

## (परिपत्रक क्रमांक- 21)

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, आर्किटेक्चर महाविद्यालयांचे प्राचार्य/ विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविणेत येते की, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे खूप वर्षानंतर अंतर्गत परीक्षेचे गुण प्रस्तुत विद्यापीठाकडे सादर करुन पुर्वीच्या निकालात दुरुस्ती करणेचे प्रस्ताव मोठयाप्रमाणात प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त होत असून किती वर्षापर्यंतचे अंतर्गत परीक्षेचे गुण स्विकारुन निकालात दुरस्ती करण्यात यावी, याबाबतचा कालावधी टरविण्याचा विषय दिनांक २५ मार्च,२०२१ रोजी झालेल्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीत विषय सादर करण्यात आला होता. सदरील विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| ठराव क्रमांक | १९ | परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्यात महाविद्यालयकडून काही दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर झाल्यास असे प्रस्ताव पदवी पुर्ण झाल्यानंतर (After Degree) तीन परीक्षा पर्यंत व १००/- रुपये प्रत्येकी दुरुस्तीसाठी महाविद्यालयाला दंड आकारण्यात यावा असे सर्वानुमते ठरले |

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाकडून वेगवेगळया अभ्यासक्रमास शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे खूप वर्षानंतर अंतर्गत परीक्षेच्या गुणात दुरुस्ती करुन मिळणेचे प्रस्ताव प्रस्तुत विद्यापीठाकडे सादर होत असल्याचे निर्दशनास येत आहे. अशा प्राप्त झालेल्या प्रस्तावावर कार्यवाही करतेवेळी ज्या त्या कार्यासनाकडील लिपिक वर्गीय शिक्षकेत्तर कर्मचा-यावर नाहकपणे मोठयाप्रमाणात कामाचा ताण पडत असून मागील कित्येक वर्षापासून संबंधित विद्यार्थ्यांचे निकालात दुरुस्ती करणेचे असे प्रस्ताव महाविद्यालयाकडून विद्यापीटास विहित मुदतीमध्ये दाखल केले नसल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत विद्यापीठाकडून वेगवेगळया अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाल्यानंतर त्यामध्ये काही दुरुस्ती असल्यास सदरील दुरुस्तीचे प्रस्ताव किती दिवसापर्यंत महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे सादर करुन त्यावर कार्यवाही करणेचा कालावधी आता पर्यंत कोणत्याही प्राधिकरणात ठरविण्यात आलेला नव्हता. प्रत्येक वर्षी सातत्याने मोठयाप्रमाणात असे प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त होत आहेत. अशा मागील जुन्या प्रस्तावावर प्रक्रिया करतेवेळी हातातील कामे बाजूला ठेऊन प्राप्त झालेल्या प्रस्तावावर कार्यवाही करावी लागत असल्याने त्याचा परिणाम नियमित कामावर होत असल्याचे दिसून येत आहे.

सबब, वरील नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता दिनांक २५ मार्च,२०२१ रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्रमांक १९ प्रमाणे निकालात दुरुस्ती करणेचे प्रस्ताव प्रस्तुत विद्यापीठास पाठवून देण्याची कार्यवाही करण्यात यावी. सदरील संमत झालेल्या ठरावानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावावरच कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रस्तुत विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठवतेवेळी संमत झालेल्या ठरावाप्रमाणेच प्रस्ताव तयार करुन विद्यापीठाकडे सादर करण्याची योग्यती दक्षता घ्यावी. संमत झालेल्या ठरावाशिवाय निकालात दुरुस्ती करणेचे प्रस्ताव प्रस्तुत विद्यापीठास पाठवून दिल्यावर अशा प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

( डॉ विकास कदम )
प्र संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति :-

१) प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य/ विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२) प्रस्तुत विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व विद्याशाखेचे कार्यासने, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

३) प्रस्तुत विद्यापीठातील संगणक विभाग,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर